PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sangate Aika
Year: 1959

Song: Sangate Aika
Lyricist: Ga. Di. Madgulkar

डोळ्या देखतची ही कथा
न्हवं भूल थापाची
बरं
ही गोष्ट माणसातल्या सापाची
न् त्याच्या पापाची
माणसात साप बी असत्यात आं
हां
नारी जातीच्या तापाची न् संतापाची
आ... आ... आ...
भले भले
बघा हवेत उडवते पगडी
कुणाच्या पापाची

केले तुका न् झाले मका
कसे झाले ते सांगत्ये ऐका
कसे झाले ते सांगत्ये ऐका
कसे झाले ते सांगत्ये ऐका
शंभु महादेवाच्या डोंगराशेजारी
बरं
गाव चिमुकलं नाव राजुरी
तिथला वतनदार पाटील भारी माजुरी
हद्द नाही त्याच्या तोऱ्याला
कुणी उभा ऱ्हाई ना वाऱ्याला
त्याचा वचक उगा साऱ्याला
बारा गावात नाव त्याचं मोठं
नाव मोठं नी लक्षण खोटं
नाव मोठं नी लक्षण खोटं
नाव मोठं नी लक्षण खोटं
आई बापानं नाव ठेवलं महादेव

अन् ह्याच्या अकलेची नंदी म्होरं धाव
कपट एवढाच पोटामंदी भाव
त्या महादेव पाटलाची नार गुणवती
त्या महादेव पाटलाची नार गुणवती
नावानं जानकी वागणुकीनं सती
तिला मिळाला असला कवडका पती
आरं रा रा रा
काय असतील त्या देवाच्या गती
व्हय व्हय व्हय
पाटलाची गावाला भीती
पर उभ्या गावाला आईच्या ठाई
जानकी होती हा जी
जानकी होती हा जी
जानकी होती हा जी
जानकी मनाची पाक
करी डोळे झाक
तिचा काही धाक
नव्हता पाटलाला
आस होय
अर्ध्यावरी संसारला
पुत्र एक झाला
नाव त्याचं कृष्णा
..... महादू पाटलाची
भयंकर त्रिष्णा
त्याच राजूरीच्या गावांदरी
होता एक जवान शेतकरी
हौसा नामे त्याची अस्तूरी
आस व्हय
रूपाची खाण तिचं रूप गोरंपान

केतकीचं पान बांधा अटकर
अंगावरी नाही दागिना
नेसे पटकुर हा जी
नेसे पटकुर हा जी
नेसे पटकुर हा जी
भोकरावानी टपोरं डोळं
केस लांब काळं गालावर तीळ
चाल हौसाची
बोलणं तीच लई छान
हरपवी भान
हसणं जणू तान मालकंसाची
सखाराम अन् हौसाची
जोडी नवसाची राज हंसाची
एक दुसऱ्याचा भोळा भक्त
काटा एकाला दुसऱ्यास रक्त
राज्य दोघांचं दोघांचं तख्त
मीठ भाकरीत दोघंजण खुशी
नांदे खोप्यात कबूतर जशी
नांदे खोप्यात कबूतर जशी
नांदे खोप्यात कबूतर जशी
बरं मंग पुढं
एकदा सखारामाची अन् पाटलाची
झाली हकनाक बाचाबाची
तेढ पडली एकमेकाची
कशावरून हो
त्यात बैलाची शर्यत ठरली
बैल पाटलाची जर का हरली
काय गावात इज्जत उरली
सखारामाची खिल्लार जोडी
होती जिताया अवघड थोडी
होती जिताया अवघड थोडी
होती जिताया अवघड थोडी
म्हादू पाटील मनामंदी भ्याला
त्याने एक मनसुबा केला
काय
सखारामाचा काटा काढण्याला
अरे अरे अरे
त्यानं गाठला एक अडाणी मैतर
सावळ्या बलदंड दरोडेखोर
अरे बाप रे
साऱ्या मुलखामदी होता म्हाजूर
होता म्हाजूर
पैक्याचं दावून आमिष
केला त्याला खुश बोलूनी जार
त्या सावळ्या दरोडेखोरानं
रातचं जाऊन दिली पेटवून
सख्याची खोप
अरे अरे अरे
घरासंग पेटला गोठा
गवताचा साठा
केवढं पाप हा जी
केवढं पाप हा जी
केवढं पाप हा जी
चहूकडे आग भडकली
त्यात अडकली खिल्लारी जोडी
अग्निने गिळली माणके
कोण त्या काढी
सखाराम व्हता कुठं
त्या दिवशी रात्रीच्या पहारी
पाटलाच्या घरी होता सखाराम
नि योजना आखून
झालं होतं बराबर काम

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

व्हय व्हय व्हय
भडकला आगीचा लोळ
झाला कल्लोळ सखा हो वेडा
काय ठावा त्यास पाटलाच्या
पापाचा पाढा हा जी
पापाचा पाढा हा जी
पापाचा पाढा हा जी
अग्नीत शिरला सखाराम त्या
पाटील त्याला घाली विळखा
म्हणे आणशील बैल गाई
जन्म पुन्हा का येतो मूर्खा
सखाराम पण शिरला वेगे
पाटील धावे त्याच्या मागे
गाव म्हणाले काय थोरवी
प्रजेस राजा असा वाचवी
मानभावी तो राजा नकली
आगीमध्ये सख्यास ढकली
नाही कळलं कुणालाच काही
सखा अग्नीत जळून जाई
सखा अग्नीत जळून जाई
सखा अग्नीत जळून जाई
सावळ्या आला पाटलाच्या घरी
त्यानं बजावली होती
पाटलाची चाकरी
पाटलानं सोनं नाणं
बांधलं त्याच्या पदरी
त्याला जाऊ दिलं दारा बाहेरी
मग त्यानं पुकारा केला
चोर तिजोरी फोडून गेला
चोर तिजोरी फोडून गेला
चोर तिजोरी फोडून गेला

सखाराम जळूनी गेला
हौसाला नुरला वाली
जानकी माय गावाची
दिलीवर पाखर घाली
मानून लेक धर्माची
वाड्यावर हौसा नेली
बेवारशी अशी पद्मिनी
आली चालून पाटलाच्या हाती
भडकला रोग मदनाचा
नि त्याच्या माथी हा जी
नि त्याच्या माथी हा जी
नि त्याच्या माथी हा जी

पुढं आला सण गौरीचा
भाऊ जानकीचा मुऱ्हाळी आला
अन् पाटलानी धाडली
धनीण माहेरपणाला
पुढं झालं काय
जानकीची हौसा मानलेली मुलगी
तिच्या संग पाटील करू लागे सलगी
तरीही नाही काही कळलं हौसाला
तिला वाटलं आईसारखा बाप मिळाला
नीच पाटलानं डागाळली तिला
असा गुराखी कसाई झाला
असा गुराखी कसाई झाला
असा गुराखी कसाई झाला
काळ तोंड घेऊन हौसा निघाली
ती नेमकी सावळ्याच्या
हाती लागली
सावळ्यानं कैद सरकारी
होती फोडलेली

पोलिसांची पलटन
त्याच्या मागं लागलेली
हलक्या लोकातच
असतात माणसं भली
सावळ्यानं हौसाला
अचूक वळखली
घडल्या पापाची झाली जाणीव
बहिण मानली हा जी
बहिण मानली हा जी
बहिण मानली हा जी
बरं म्होरं झालं काय
निसर्गानं होती आपली
कामगिरी केली
बी धरणीवर पडली
ती वरी अंकुरा आली
हौसा पोटुशी आहे
ही गोष्ट सावळ्यानं वळखली
वैऱ्याची लेक वैऱ्याच्या घरी जन्मली
जल्म घालून पाप पाटलाचे
हौसा संपली
देवाघरी गेली हा जी
देवाघरी गेली हा जी
देवाघरी गेली हा जी
सावळ्या काय सांभाळील मुकं लेकरू
त्यात आली पोलिस पलटन
सावळ्याला धरू
पळता पळता पोर चिमुकलं
त्यानं एकीच्या हवाली केलं
त्यानं एकीच्या हवाली केलं
त्यानं एकीच्या हवाली केलं
पुढं ऐका योगायोगाच्या गोष्टी
ही बह्म देवाची आगळी सृष्टी
पंधरा वर्षं निघून गेली
हौसाची पोर वयामधी आली
गंगा पापानं गढूळ झाली
लेक हौसाची तमाशेवाली
लेक हौसाची तमाशेवाली
लेक हौसाची तमाशेवाली
म्हादू पाटलाचा कृष्णा होय थोर
त्याच्या दृष्टिला पडे ही पोर
दृष्ट भेटीत जडली हो प्रीती
भावा बहीणीत पापाच्या भिंती
भावा बहीणीत पापाच्या भिंती
भावा बहीणीत पापाच्या भिंती
कृष्णा नात्यानं आपला भाऊ
हे ठाऊक नाही हौसाच्या लेकीला
हौसाच्या लेकीचं वेड
पाटलाच्या लेकाला
हे शोभत नाही पाटलाच्या झोकाला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*